गुंतवणूक मार्गदर्शक

## थेट शेअर बाजारात उडी मारण्यापूर्वी गुंतवणूक करण्याची पूर्वतयारी समजून घ्या

शेअर बाजारात गुंतवणूक करणे आता अगदी सोपे झाले असल्याने अधिकाधिक लोक बँकांमध्ये शिल्लक रक्कम ठेवण्याच्या ऐवजी किंवा ठेवी (डिपाझिट) ठेवण्यापेक्षा गुंतवणूक करण्याच्या पर्यायाकडे झुकू लागले आहेत. हे जाणून घ्या की आजच्या डिजिटल जगात डिमॅट खाते आणि ट्रेडिंग खाते अवघ्या अर्ध्या तासात सेट केले जाऊ शकते आणि अशा खात्यांद्वारे गुंतवणूकदाराला त्यासाठी लागणा-या अटींची पूर्तता करून भारतात आणि परदेशात ऑनलाइन गुंतवणुकीची सुविधा देखील मिळू शकते. शेअर्स मध्ये गुंतवणूक करणे जरी सोपे झाले असले तरी पुढे जाण्यापूर्वी आपण काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत.

### प्रथम, आर्थिक उद्दिष्टे निश्चित करा.

गुंतवणूक सुरू करण्यापूर्वी आर्थिक उद्दिष्टे निश्चित करण्याचे अनेक फायदे आहेत. सर्व प्रथम तर हे समजून घेतले पाहिजे की गुंतवणूक ही एक विशिष्ट ध्येय साध्य करण्याच्या उद्देशाने केली पाहिजे, केवळ गुंतवणूक करायची आहे म्हणून करू नये. उदाहरणार्थ, मुलांच्या शिक्षणासाठी, निवृत्तीसाठी किंवा परदेशी प्रवास करण्यासाठी. बचत ही पुरेशी असू शकते, पण गुंतवणूक नाही! ज्या दिवशी तुमची पहिली कमाई होते, त्याच दिवसापासून बचतीचा एक भाग आपण गुंतवणुक करण्याच्या दृष्टीने वळवावा.

नीट समजून घ्या की कमाई करणे, त्यातून बचत करणे आणि त्यातून गुंतवणूक करणे हा योग्य क्रम आहे, न की कर्जात जाणे (आपण ते ईएमआय भरून वाचू शकता!), बचत केल्यानंतर  उत्पन्नाचा काही भाग कर्जाची रक्कम म्हणून भरणे किंवा कर्जाची रक्कम भरण्यास विलंब करणे. आपण एक गोष्ट नीट समजून घेतली पाहिजे ती म्हणजे पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये बचत आणि काटकसरीचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे बचत आणि गुंतवणुकीचा पोर्टफोलिओ तयार करून तो तुमच्या 'गृहमंत्र्यां' कडे सोपवावा.

### एसआयपी, एसटीपी आणि एसडब्ल्यूपी

म्युच्युअल फंडांद्वारे इक्विटी मध्ये गुंतवणूक करणे हा दीर्घकालीन सर्वोत्तम पर्याय असल्याचे सिद्ध होते, ताकद आणि आकारानुसार, 1000 रु. ची एक वेळची गुंतवणूक लाखो पर्यंत करता येते. एसआयपी- ठराविक तारखांना ठराविक निश्चित रकमेची नियमित गुंतवणूक, तर काही योजनांमध्ये फक्त 100 रु. ची एक लहान मासिक बचत सुद्धा करता येते. एसडब्ल्यूपी (सिस्टमॅटिक विथड्रॉल प्लॅन). अशा म्युच्युअल फंड योजना देखील आहेत ज्या नियमितपणे एक-वेळच्या ठेवीतून ठराविक रक्कम देतात, जी तुम्हाला सरकारी सिक्युरिटीज, डेट इन्स्ट्रुमेंट्स, बाँड मध्ये केलेल्या गुंतवणुकीतून मिळणाऱ्या व्याज उत्पन्नातून दरमहा एक निश्चित रक्कम देते. अशा प्रकारची रक्कम काढू नये आणि कर्ज योजनांमधून इक्विटी योजनांमध्ये नियमित हस्तांतरण करण्याच्या पद्धतीला एसटीपी (सिस्टमॅटिक ट्रान्सफर प्लॅन) म्हणतात, काही प्रकरणांमध्ये एसटीपी

देखील केला जाऊ शकतो. समजा, 2001 मध्ये एका व्यक्तीद्वारे रु. 500 रक्कम एसआयपी निफ्टी फिफ्टीच्या कोणत्याही म्यु. फंडच्या योजनेत नियमित भरण्यात आली. एक लाख 38 हजारांची ही गुंतवणूक वाढून रु. 5 लाख झाली. त्याला वाटले की मार्केट खूप जास्त आहे आणि गुंतवणुकीची रक्कम 3-4 पट वाढली आहे त्यामुळे या रक्कमेतून त्याने रु. 3 लाख काढले आणि सरकारी बाँड मध्ये गुंतवले. म्यु. फंड एजंटला फंड स्कीम मध्ये जमा केलेल्या रकमेपैकी 1000 रुपये दरमहा परत त्याच इक्विटी योजनेत हस्तांतरित करण्याचे निर्देश दिले. याने त्या व्यक्तीला 3 लाख रु. च्या रकमेवर निश्चित व्याज मिळेल आणि इक्विटी मधील एसआयपी द्वारे बाजारातील गुंतवणूक वाढेल, ज्यामध्ये बाजारातील चढ-उताराचाही फायदा होईल. आर्थिक आणि खर्चाच्या नियोजना शिवाय बचत करणे ही एक उद्दिष्टहीन कवायत असल्याचे सिद्ध होते. आजच्या डिजिटल जगात, तुमच्या बचत खात्यात निष्क्रिय पैसे पडून राहिले नसतील तरच तुम्ही २१ व्या शतकातले गणले जाल. तुमचे उर्वरित पैसे शेअर मार्केट मध्ये गुंतवण्यासाठी वापरले जाऊ शकतात. तुम्हांला किती, किती काळ, किती काळ गुंतवणूक करायची आहे याचे धोरण आखणे आवश्यक आहे.

INTERNAL